महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

जेएनपीटीच्या पाचव्या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना
१२.५० टक्क्याचे इरादा पत्र मिळणेबाबत

(१) ७१२ (१५-०१-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेएनपीटीच्या पाचव्या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना पंतप्रधानांच्या हस्ते १२.५० टक्केचे इरादा पत्र देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित १८ गावांच्या प्रकल्पग्रस्तांना सदरची इरादा पत्रे किती कालावधीत देण्यात येणार आहे तसेच जागेचा ताबा केव्हापर्यंत देण्याचे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) :(१) होय.

(२) जे.एन.पी.टी. प्रकल्पासाठी सिडकोने हस्तांतरीत केलेल्या जमिनीच्या भूधारकांना १२.५ टक्के जमीन वाटप योजनेचा लाभ देण्याबाबतचा शासन निर्णय दि.१४.८.२०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी, रायगड यांनी जे.एन.पी.टी. प्रकल्पासाठी संपादीत करण्यात आलेल्या १२ गावांच्या पात्र खातेदारांची यादी मुख्य व्यवस्थापक, जे.एन.पीटी. यांना सादर केली अहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे. जे.एन.पी.टी. ने यासाठी जमीन उपलब्ध करुन दिल्यानंतर सिडकोकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथील कुंभमेळ्यासाठी करावयाच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना

(२) १८९१ (२७-०१-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकमध्ये पुढच्यावर्षी होणारा कुंभमेळा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी तब्बल २३०० कोटीची साधनसामग्री व सुरक्षिततेच्या उपाययोजना राबविल्या जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने व केंद्र शासनाने या कुंभमेळयासाठी माहे नोव्हेंबर, २०१४ अखेर किती निधी उपलब्ध करुन दिला आहे व यासाठी अजून किती निधीची आवश्यकता आहे,

(३) उपरोक्त कुंभमेळयाच्या विविध कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :(१) नाशिक व त्रंबकेश्वर येथे सन २०१५-२०१६ मध्ये संपन्न होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी विविध २२ यंत्रणांचा समावेश असलेल्या रुपये २३७८.७८ कोटी रुपये अंदाजे किंमतीच्या आराखड्यास शिखर समितीने मान्यता दिली आहे.

(२) नोव्हेंबर २०१४ अखेरपर्यंत सिंहस्थ कुंभमेळ्याकरीता केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध झालेला नसला तरी राज्य शासनाकडून सुमारे ९४१.६३ कोटी इतका निधी उपलब्ध करण्यात आलेला आहे.

त्याचप्रमाणे नोव्हेंबर २०१४ पासून राज्य शासनाने ९११.३९ कोटी निधी उपलब्ध केला असून याशिवाय ७९.७५ कोटी निधीची आवश्यकता आहे.

(३) कुंभमेळ्याच्या अनुषंगाने पायाभूत सुविधांची बहुतांश कामे पुर्ण झाली आहेत.

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकांतर्गत बीएसयूपी योजनेच्या निधीतील अपहाराची चौकशी करण्याबाबत

(३) २८७४ (२३-१२-२०१४). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकांतर्गत बीएसयूपी योजनेच्या निधीतील अपहाराची चौकशी करण्यासंदर्भात नांदेड येथील सामाजिक कार्यकर्ते श्री.बाबूभाई शेख यांनी दिनांक २० ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास मा.सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना एक निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१६-०२-२०१६) :(१) हे खरे नाही. प्रस्तुत निवेदन नगर विकास विभागास प्राप्त झालेले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मीरा-भाईदर, मंबई, नवीमुंबई, वसई, विरार, ठाणे, कल्याण, डोंबिवली या महानगरपालिकेमध्ये एमएमआरडीएच्यामार्फत झालेली विकास कामे

(४) ३१८१ (२३-१२-२०१५). श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईदर, मंबई, नवीमुंबई, वसई, विरार, ठाणे, कल्याण, डोंबिवली या महानगरपालिका एमएमआरडीएच्या अंतर्गत येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील १० वर्षात एमएमआरडीएमार्फत या महानगरपालिकांतील शहारांत एकूण किती आणि कोणत्या ठिकाणी विकास कामे झाली व त्याचा प्रत्येकी खर्च किती आणि त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) तसेच शासनाला या मीरा-भाईदर शहर महापालिकेकडून व्हॅट, स्टॅम्पडयुटी यासारख्या करांच्या माध्यमातून प्रतिवर्षी एकूण किती महसुली कर प्राप्त होतो,

(४) मागील पाच वर्षाची माहिती देण्यात यावी ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०१६) :(१) व (२) होय.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील पायाभूत सुविधा विकसीत करण्यासाठी मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्प राबविला आहे. मुंबई महानगरात मुंबई प्राधिकरण क्षेत्रातून रोज लाखो नागरीक कामा निमित्त येत असतात. त्यांना मुंबईतील नागरी सुविधांचा लाभ घेतात यावा या दृष्टीने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचा विस्तार मुंबई महानगरपालिका क्षेत्राबाहेरील प्राधिकरण क्षेत्रात करणे गरजेचे आहे. तसेच उपनगरीय परिक्षेत्राचा विकास होण्यास व औद्योगिक भरभराटी होऊन रोजगारांच्या नवनवीन संधी उपनगरीय परिक्षेत्रात उपलब्ध होऊन बृहन्मुंबईच्या पायाभूत सुविधांवर पडणारा अतिरिक्त भार कमी करण्यास्तव मदत होणार आहे.

ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, कर्जत, खालापूर, पनवेल, वसई-विरार आणि मिरा-भाईंदर रस्ते, उड्डाणपूल करीता सुमारे रु.१४९३.२६ कोटी इतक्या अंदाजित खर्चाच्या कामांस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मान्यता दिली असून यामधून ३ खाडी पुल बांधणे, २ रेल्वे उड्डाणपूल बांधणे, ९ उड्डाणपूल बांधणे व १३१.५० कि.मी. रस्त्याचे रुंदीकरण व सुधारणा करणे अशा कामांचा समावेश आहे.

त्यापैकी ६१.०० कि.मी. रस्त्याचे काम व पनवेल, वाघबिळ, मानपाडा व पातलीपाडा येथील उड्डाणपूल, शिळ महापे, कापुरबावडी व नायगांव-जुचंद्र रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपूल ही कामे प्रगतीत आहे. यातील काही कामे ठाणे महानगरपालिका व म.रा.र.वि. महामंडळाकडे प्राधिकरणाकडून निधी उपलबध करुन देऊन त्यांच्यामार्फत कार्यन्वित करण्यात येत आहेत. मुंबई महानगर प्रदेश क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी मुंबई महानगर प्रदेशातील धार्मिक स्थळे/पर्यटन स्थळे/औद्योगिक क्षेत्र/शैक्षणिक क्षेत्रास जोडणाऱ्या, अंदाजित किंमत रु.१११३.३५ कोटी किंमतीच्या महत्वाच्या अतिरिक्त कामांस मान्यता प्रदान केली आहे. त्यामध्ये ०५ उड्डाणपूल बांधणे व १४५.१२ कि.मी. रस्त्यांचे रुंदीकरण व सुधारणा करण्याचा समावेश आहे. रस्त्यांच्या सुधारणांपैकी ५० कि.मी. रस्त्यांचे काम पुर्ण झाले असून उर्वरित कामे जुन, २०१६

पर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पुर्ण अपेक्षित आहे.
(३) व (४) मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून कार्यकंत्राटावरील टीडीएसच्या माध्यमातून गेल्या पाच वर्षात एकूण रु. २५,८६,६६,९४४/- इतका व्हॅट शासनास प्राप्त झाला आहे. तसेच सदर महानगरपालिकेकडून मिळकतीचे नोंदविलेल्या दस्तऐवजांचे मागील पाच वर्षात मुद्रांक शुल्क रु.२०,१९,६६,७५,२११/- व नोंदणी फी रु.२३४,९७,६१,९४९/- असे एकूण रु.२२,५४,६४,३७,१६०/- इतका महसूल प्राप्त झाला आहे.

अंधेरी (पूर्व), मुंबई येथील चांदीवली पसिरातील बेस्ट कर्मचारी वसाहतीतील गाळे कर्मचाऱ्यांच्या नावे करून देण्याबाबत

(५) ४५१६ (२३-१२-२०१४). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेस्ट उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी बेस्ट उपक्रमाने सन १९९४ मध्ये अंधेरी (पूर्व) मुंबई येथील चांदीवली परिसरातील सुमारे ४६८ गाळ्यांनी युक्त अशा ४ इमारती म्हाडाकडून विकत घेतल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गाळे बेस्ट उपक्रमातील कर्मचाऱ्यांना मालकी तत्वावर वितरीत करणे शक्य व्हावे, याकरीता म्हाडाकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी बेस्ट उपक्रमाकडून सन २००६ पासून सातत्याने पत्रव्यवहार सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून आजतागायत कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, उक्त प्रकरणी होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१६) :(१) बेस्ट उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यासाठी बेस्ट उपक्रमाने सन १९९४, १९९६ व १९९७ या वर्षामध्ये म्हाडा प्राधिकरणाकडून ११७ गाळ्यांची एक अशा चार इमारती विकत घेतल्या ज्यात एकूण ४६८ गाळे असून त्यात बेस्ट कर्मचारी वास्तव्य करीत आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) म्हाडा प्राधिकरणाकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिहणे अद्यिापि प्रलंबित आहे. तथापि बेस्ट उपक्रमाकडे कर्मचारी वसाहतीतील गाळे हवे असणाऱ्या कर्मचा-यांची प्रतिक्षा यादी वाढल्याने व त्या अनुषंगाने निवासी गाळ्यांची कमतरता भासू लागली. सबब, चांदिवली येथील इमारतीतील गाळे कर्मचा-यांना मालकी तत्वावर वितरीत केल्यास निवासी गाळ्यांसाठी प्रतिक्षा यादीवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर ते अन्यायकारक ठरेल असे वाटल्याने सदरचे गाळे कर्मचाऱ्यांना मालकी तत्वावर वितरीत करण्याबाबतचा निर्णय बेस्ट उपक्रमाकडून प्रलंबित ठेवण्यात आला आहे.

अकोला महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना गेल्या ५ महिन्यांपासून वेतन न मिळाल्याबाबत

(६) ८१९३ (१७-०४-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना मागील ५ महिन्यांपासून वेतन मिळाले नसून पाचवा वेतन आयोगाची रक्कम देण्यात आली नाही, यासह सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची पेन्शन देण्यात आली नाही, तसेच कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या महापालिका व शासनस्तरावर अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी अकोला महानगरपालिका कर्मचारी संघर्ष समितीने आंदोलन केले असून कामबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांचे वेतन ५ महिन्यापासून थकविण्याची कारणे काय व इतर मागण्या पूर्ण न होण्याची कारणे काय,

(४) असल्यास, त्यांचे वेतन देऊन अन्य सर्व मागण्यांवर तोडगा काढण्याकरीता शासन कोणती कार्यवाही करीत आहे वा करणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :(१) नाही. वित्त उपलब्धीनुसार दरमहा वेतन, सेवानिवृत्ती वेतन व ५ व्या वेतन आयोगानुसार येणारी फरकाची रक्कम मनपाकडून अदा केली जात आहे.

(२) होय.

(३) महानगरपालिकेमध्ये कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचा-यांचे वित्त उपलब्धीनुसार माहे सप्टेंबर, २०१५ चे वेतन व मनपा शिक्षकांचे माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१५ चे वेतनावरील ५०% हिस्सा देणे बाकी आहे.

इतर मागण्यापैकी वेतन विषयक मागण्या ह्या वित्तलब्धीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्यात येत आहेत व आस्थापनाविषयक बाबी ह्या नियमातील तरतुदीनुसार पूर्ण करण्याची कार्यवाही महापालिका स्तरावर सुरु आहे.

(४) महापालिकेचा महसूल वाढविण्साठी कठोर पावले उचलण्याबाबत आयुक्त, अकोला महानगरपालिका यांना सूचना दिल्या आहेत. तसेच आस्थापना विषयक बाबींचे निराकरण होण्यंसाठी सेवाप्रवेश नियम व आकृतीबंध मंजूर करुन घेण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

पनवेल परिसरात पायाभुत सुविधा नसल्याबाबत

(७) ११६३४ (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई, पनवेल (जि.रायगड) परिसरातील जमिनी सन १९७० मध्ये सिडकोने संपादीत केल्या असून सिडकोकडून रस्ते, पाणी, मैदाने, व्यायाम शाळा, उद्यान, शौचालये, अंतर्गत पथदिवे, शाळेकरीता मैदाने, गटारे अशा पायाभुत सुविधा देण्याचे आश्वासन दिले होते परंतु आजतागायत सदरहू आश्वासनाची पुर्तता न झाल्याने गावांचा विकास होवू शकला नसल्याचे

माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावठाणाच्या विकासात सिडकोला फायदा नसल्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या या गावांना पायाभूत सुविधा पुरविल्या गेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी पायाभुत सुविधा पुरविण्यासाठी शासनाने कोणती आवश्यक ती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :(१) व (२) नाही.
(३) सिडको क्षेत्रातील गावांना पायाभुत सुविधा पुरविण्यासाठी जीआयए योजनेच्या अंतर्गत वित्तीय सहायता पुरविण्यात येत आहे. ग्रामपंचायत त्यांच्या गरजेनुसार ठराव पारित करुन सिडकोस सादर करतात व तद्नंतर ते काम जीआयए योजनेंतर्गत घेण्यात येते. मार्च, २०१५ अखेर सिडकोकडून जोआयए योजनेंतर्गत रु.२१२३.३५ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे. सद्या २.४२ कोटी रुपयांची कामे सुरु असून याव्यतिरिक्त सिडकोच्या ठराव क्र.१०८५९, दि.८.७.२०१३ अन्वये जीआयए योजनेंतर्गत कामांसाठी रु.१८०.०० कोटी मंजूर केले आहेत. पनवेल परिसरासाठी यामध्ये रु.२६.८५ कोटी ची तरतुद आहे. सद्यस्थितीत ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार कामे सुरु आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुनस्टार को-ऑप हाऊसिंग सोसायटी गफुर खान इस्टेट,
कुर्ला (प) येथील अनधिकृत बांधकामाबाबत

(८) ११७५८ (०८-०३-२०१५). श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कुर्ला येथील न.भू.क्र.३९ येथील मुनस्टार को-ऑप हाऊसिंग सोसायटी गफुर खान इस्टेट, कुर्ला (प) येथील अनधिकृत बांधकामाची चौकशी करून दिनांक ५ ऑगस्ट, २०१३ रोजी लोकशाही दिनी दाखल केलेल्या तक्रारीवर निर्णय देतांना बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी सदर इमारत बांधकाम तातडीने निष्कासित करण्याचे आदेश देऊन आज दीड वर्षांचा कालावधी उलटूनही अद्यापी अनधिकृत बांधकामासंदर्भात कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अनधिकृत बांधकाम तातडीने निष्कासित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी मा.उपायुक्त, (परिमंडळ-५) बृहन्मुंबई महानगरपालिका, कुर्ला (प) यांना पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त इमारतीच्या अनधिकृत बांधकाम तातडीने निष्कासित करण्यास विलंब लागण्यामागची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (२१-१२-२०१६) :(१) हे खरे नाही.

याबाबतची वस्तुस्थिती अशी आहे की, सी.टी.एस.क्र. ३८, ३९, ३९/१ ते ५७ गफुर खान इस्टेट, एल.बी.एस. मार्ग, कुर्ला (प) येथील मुनस्टार को-ऑप हाऊसिंग सोसायटीच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत प्राप्त तक्रारीस अनुसरुन उपायुक्त, झोन-५ बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि.१९.०८.२०१३ च्या पत्रान्वये कळविले होते की या याजनेतील इमारतीस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने परवानगी दिली आहे किंवा कसे, इमारतीस परवानगी दिली नसल्यास ती निष्कासित करणे आवश्यक आहे किंवा जर इमारतीस परवानगी दिलेली असल्यास अर्जदारास दिशाभूल करणारी माहिती देण्यात येऊ नये.

(२) होय.

मा.लोकप्रतिनिधींचे दि.६.२.२०१५ चे निवेदन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाने याबाबतची वस्तुस्थिती मा.लोकप्रतिनिधींना दि.९.७.२०१५ च्या पत्रान्वये कळविली आहे.

(३) कुर्ला (प) येथील मुनस्टार को-ऑप हाऊसिंग सोसायटीच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस दि. ६.१२.२००० रोजी आशयपत्र देण्यात आले आहे. या योजनेमध्ये पुनर्वसन व विक्री घटकाच्या ३ इमारतीपैकी इमारत क्र.१ (तळ+ ७ मजले) चे आराखडे दि.२२.१२.२००० रोजी मंजूर करुन दि.१४.०३.२००१ रोजी जोत्यापर्यंच बांधकामास परवानगी दिली आहे. तद् नंतर दि.२२.०९.२००३ रोजी सुधारीत आशयपत्र देऊन दि.१०.०९.२००४ रोजी तळ + ७ मजल्याचे सुधारीत आराखडे मंजूर केले आहेत. या इमारतीस दि.२३.०९.२००४ रोजी तळ + ७ मजल्यासाठी दिलेल्या इमारत बांधकाम परवान्यानुसार इमारतीचे काम पूर्ण झालेले आहे. तथापि, सदर इमारतीस अद्याप भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. त्यामुळे ह्या इमारतीचे निष्कासन करण्याची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-भिवंडी (जि.ठाणे) रस्त्यावर पिंपलास नाक्याजवळ टॉवर हटवून आणि खाडी मातीने भरून अवैधरीत्या घरे बांधण्यात आल्याबाबत

(९) १४२५९ (०४-०४-२०१५). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-भिवंडी (जि.ठाणे) रस्त्यावर पिंपलास नाका असून, या नाक्याजवळ मोठी खाडी व विद्युतचे टॉवर होते, ते टॉवर हटवून तसेच खाडी मातीने भरून पाच हजार घरे बांधून टाटा कॉलनी तयार करण्यात आली आहे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-भिंवंडी रस्त्यालगतलची संपूर्ण जमीन शासनाची असताना देखील खाडी बुजविण्याची व विद्युतचे टॉवर हटविण्याची परवानगी कोणी दिली आहे

(३) असल्यास, खाडी बुजल्याने पिंपलास व आजुबाजूच्या गावास पावसाळयात पाणी भरण्याची शक्यता निर्माण झाली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनान चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून

आले आहे व त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१६) :(१), (२), (३) व (४) ठाणे-नाशिक रस्त्यावर (रा.म.क्र.४) रांजणोली जंक्शन (पिंपलास नाका) येथे उड्डाणपूलाचे बांधकामास अडथळ्याचे ठारणारा तारमार्गाचा एक टॉवर २२ केव्ही ४०० चौ.मी.मी. क्षमतेच्या भूमिगत केबल टाकून काढून टाकण्यात आला आहे. मौजे राजणोली, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील सर्व्हे क्रमांक ३२ व इतर खाजगी जागेवर भाडे तत्वावर घरे बांधण्याचे काम मेसर्स टाटा हौसिंग डेव्हल्पमेन्ट कं.प्रा.लि. मार्फत सुरु केले आहे. सदर जमिनीवर ३ विद्युत टॉवर उभे असून कोणताही विद्युत टॉवर हटविणत आलेला नाही. सदर जागेलगत नैसर्गिक पोटनाला असून सदर पोटनालयाच्या दुतर्फा सदर कंपनीने संरक्षित भिंत बांधलेली असून त्यामुळे पिंपळास व आजुबाजुच्या गांवात पाणी भरण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मरीन ड्राईव्ह, मुंबई येथील रस्त्याची दुरुस्ती व सौंदर्यीकरणाचे काम हाती घेतल्याबाबत

(१०) १६८८१ (११-०८-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मरीन ड्राईव्ह, मुंबई येथील रस्त्याची दुरुस्ती व सौंदर्यीकरणाचे महत्वाकांक्षी काम हाती घेऊन दुभाजकांवर लावलेली लाखो रुपयाची रोपटी उन्हात करपली असल्याचे व सौंदर्यीकरणासाठी लावण्यात आलेल्या पेटुनिया या रोपट्याचे आयुष्य अवघ्या काही महिन्याचे असतांनाही महानगरपालिकेने मे महिन्याच्या रणरणत्या उन्हात या सुकलेल्या झाडामुळे मरीन ड्राईव्ह रस्त्याचे सौंदर्यीकरणाऐवजी विद्रुपीकरण झाले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समुद्रकिना-यालगतच्या रस्त्याचे बांधकाम गेल्या वर्षी सुरु झाले या कामाअंतर्गत रस्त्याच्या दुरुस्तीसोबतच दुभाजकांवर फुलझाडे लावून सौंदर्यीकरण करण्याचेही अंतर्भूत होते मात्र या ठिकाणी शहरातील इतर ठिकाणी लावलेली बारमाही झुडपे लावण्याऐवजी केवळ जानेवारी ते मार्च दरम्यान फुले येणा-या पेटुनियाची रोपटी लावली गेली सदरहू रोपटी एक वर्षापेक्षा अधिक जगत नसल्याने मे महिन्याच्या सुरुवातीलाच सुकून गेल्याने मरीन ड्राइव्हचा रस्ता विद्रुप दिसत आहे, प्रायोगिक तत्वावर लावलेली ही रोपटी शहराच्या इतरही वाहतूक बेटावर लावण्याचा मुंबई मनपाचा विचार आहे वर्षातून दोनवेळा ही रोपटी लावण्यात येणार आहेत व याचा खर्च रस्त्याच्या कामामध्येच समाविष्ट करण्यात आलेला आहे अल्पजीवी रोपट्याचा वाहतूक बेटावर लावण्याचा खर्च रस्त्याच्या कामामध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे अल्पजीवी रोपट्यांचा वाहतूक बेटावर लावण्याचा खर्च निरर्थक असून

तरी या प्रकरणी शासन कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१६) :(१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मरीन ड्राईव्ह येथील रस्ता हा मुंबई शहरातील प्रमुख रस्त्यांपैकी एक असून सदर रस्त्याच्या पुनर्पृष्टीकरणासहीत रस्त्यामधील दुभाजकांच्या सुशोभिकरणाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे प्रगतीपथावर आहे.

सदर ठिकाणी सुधारीत दुभाजकांवर बहरणारी हंगामी फुलझाडे लावून परिरक्षित करण्याची तरतूद या कामामध्ये अंतर्भूत आहे. त्यानुसार सदर ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारची फुलझाडे लावण्यात येतात.

वातावरणातील बदलामुळे, प्रदुषणामुळे व उन्हामुळे करपरलेली/कोमेजलेली फुलझाडे वेळोवेळी बदलण्याची रतूद सदर कंत्राटदाराच्या कंत्राटात अंतर्भूत केलेली असून कंत्राटदारमार्फत सदर ठिकाणी फुलझाडे वेळोवेळी बदलण्यात येतात.

सद्य:स्थितीत सदर ठिकाणी पावसाळ्याच्या ऋतुमानानुसार रोपटी लावण्यात आलेली आहेत. प्रायोगिक तत्वावर लावलेली पेटुनियाची रोपटी शहराच्या इतर वाहतुक बेटावर लावण्याचा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा सद्य:स्थितीत विचार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल (ता.जि. रायगड) येथील सिडकोच्या कळंबोली, कामोठे, खारघर येथे स्मशानभूमीत कामगारांची कमतरता असल्याबाबत

(११) १७४७७ (११-०८-२०१५). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.जि. रायगड) येथील सिडकोच्या कळंबोली, कामोठे, खारघर येथे स्मशानभूमीत कामगारांची कमतरता असल्याने मृतांच्या नातेवाईकांना सरण रचण्याचे काम करावे लागत असुन अशातच लाकडेही ओलीच मिळत असल्याने एकावेळी दोन मृतदेह अंत्यविधीसाठी आणले तर त्यांना नातेवाईकांना ताटकळत उभे रहावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खेर आहे काय,
(२) असल्यास, यामुळे अनेक वेळा मृतदेह अर्धवट जळत असुन लाकडांची व्यवस्था करण्यास चार तासांचा वेळ लागत असल्याने नोतवाईक कंटाळत असतात वास्तविक नवी मुंबई व मुंबई मनपाकडे अंत्यविधीसाठी लाकडे मोफत दिली जात असतांनाही सिडको प्रशासनाकडून स्मशानात अव्वा ते सव्वा दराने लाकडे दिली जात आहेत, हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :(१) नाही. सिडको नोडमधील खारघर, सेक्टर १४ व सेक्टर २६ मधील स्मशानभूमीत तसेच सेक्टर १५ कामोठे, सेक्टर १५ कळंबोली अशा एकूण चार स्मशान भूमी असून प्रत्येक ठिकाणी एकूण ७ कामगार देण्यात आलेले आहेत. सदर कामगारांची संख्या पुरेशी आहे. तथापि, सिडकोच्या कामोठे येथील स्मशानभूमीबाबत दि. १२.५.२०१५ रोजी एसएमएसद्वारे तक्रार प्राप्त झाल्याने सदर स्मशानभूमीची देखभाल करणाऱ्या ठेकेदाराच्या बिलातून मासिक रु. ३,०००/- ची कपात करण्यात आली आहे.

(२) सिडको नोडमधील खारघर सेक्टर १४ व सेक्टर २६ मधील स्मशानभूमीत तसेच सेक्टर १५ कामोठे, सेक्टर १५ कळंबोली येथील स्मशानभूमीत मृतव्यक्तीचे अंत्यविधीसाठी मोफत जळाऊ लाकडे पुरविण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब सिडकोच्या स्तरावर विचारात आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील आमदार, खासदारांच्या विकास निधीतून शहरातील विविध भागात उभारण्यात आलेले बसस्टॉप पीएमपीएमलच्या ताब्यात देण्यातबाबत

(१२) १७६२३ (१२-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील आमदार, खासदारांच्या विकास निधीतून शहरातील विविध भागात उभारण्यात आलेले बसस्टॉप अद्यापही पीएमपीएमएलच्या ताब्यात देण्यात न आल्याने पीएमपीचे उत्पन्न बुडत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आह काय,

(२) असल्यास, उक्त विकास निधीतून पीएमपी सक्षम करण्यासाठी शहरातील अनेक भागात अत्याधुनिक पध्दतीने बसस्टॉप उभारून अनेक वर्षे उलटली तरी यातील बहुतांश बसस्टॉप आजही पीएमपीएमएल प्रशासनाच्या ताब्यात दिलेले नसुन या बसस्टॉपवर विविध कंपन्या आणि राजकीय जाहिराती करण्यात आलेल्या या जाहिराती या बेकायदा लावण्यात आलेल्या आहेत हे पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१६) :(१) नाही.

खासदार, आमदार यांचे विकास निधीतून पुणे शहरामध्ये १५७ बसथांबे बांधून पूर्ण झाले आहेत. पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील सोल ॲडव्हटाईजिंगचे हक्क दिनांक १.२.२०१५ पासून ३ वर्षाकरिता मे. पायोनियर पब्लिसिटी प्रा.लि. या एजन्सीस देण्यात आलेले आहेत. या जाहिरात एजन्सीकडून महामंडळास दिनांक १.२.२०१५ च्या करारानुसार प्रति बंस थांबा रुपये ४०००/- प्रतिमाह या दराने रॉयल्टी प्राप्त होत आहे.

(२) विकासनिधीतून उभारण्यात आलेले बसथांबे महामाडळाच्या ताब्यात असून, करारातील तरतूदीनुसार विविध प्रकारच्या जाहिराती लावण्याचा हक्क संबंधित जाहिरात ठेकेदार यांचेकडे असल्याने बेकायदा जाहिरातीचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील पाळीव प्राण्यांच्या संपर्कात आल्यास मनुष्याला मोठ्या प्रमाणात अपंगत्व अथवा प्रसंगी मृत्यू होऊ शकत असल्याबाबत

(१३) १७८५१ (१४-०८-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत दाटीदाटीने वसलेल्या शहरामधील नागरी भागात विविध प्रकारचे प्राणी पाळले जातात अशा प्राण्याच्या संपर्कात आल्यास मनुष्याला विषाणुजन्य सांसर्गिक (झुनोसिस) रोग होऊन मोठ्या प्रमाणात अपंगत्व अथवा प्रसंगी मृत्यू होऊ शकत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन त्वरीत चौकशी करून आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या "जनरल फंड" खात्यातून रक्कम वळती केल्याची घटना

(१४) १७९९४ (११-०८-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या "जनरल फंड" खात्यातून तीन नोटीसा बजावून कर्मचारी निवृत्ती वेतनधारक आणि कंत्राटदारांच्या टीडीएसच्या रकमेचा भरणा न केल्याने प्राप्ती खात्याने तब्बल ७४.८० कोटी रुपये वळते केल्याची घटना माहे मे, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निकर्ष काय आहेत, या प्रकरणास जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे.
(४) याबाबत अद्यापही चौकशी पूर्ण झाली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय,
(५) याबाबतची सद्यस्थिती काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे. मुंबई महानगरपालिकेने सन २००७-०८ पासून सन २०१४-१५ पर्यंत कर्मचारी ठेकेदार तसेच निवृत्तीवेतनधारक यांच्याकडून वसूल केलेला रु. १८,४४,६०,५८,८६१/- एवढा आयकर वेळोवेळी आयकर खात्यात जमा केलेला आहे.

आयकराचे कोणतेही देणे महापालिकेने प्रलंबित ठेवलेले नाही. तथापि, आयकर विभागाने रु. ७४,८०,५८,८५१/- एवढी रक्कम दिनांक २८.०३.२०१५ रोजी परस्पर वळती करुन घेतली आहे.

(२) व (३) याबाबत पडताळणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या कंपनीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर यासंबंधी निर्णय घेणे शक्य होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) आयकर प्रणालीतील काही तांत्रिक अडचणी शोधून काढून त्यावर आवश्यक कार्यवाही करुन रु. ७४.८० कोटी ही रक्कम परत मिळविण्याच्या दृष्टीने स्थायी समितीच्या दिनांक २९.०५.२०१५ रोजीच्या ठरावान्वये मे.सिंग्रोडीया गोयल आणि कंपनी या आयकर सल्लागाराची नेमणूक करण्यात आली असून त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम पूर्ण होताच सदरची रक्कम परत मिळविण्याबाबतचा दावा आयकर खात्याला सादर करण्यात येईल.

मालेगांव (जि.नाशिक) येथील बुनकर बाजाराचे बांधकाम करण्याबाबत

(१५) १९५५६ (११-०८-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) येथील बाजाराचे बांधकाम महानगरपालिका करते परंतु बाजार बनविण्याकरीता I.D.S.M.T. कडून या करिता निधी मिळाला आहे परंतू संबंधित ठेकेदाराला ब्लॅक लिस्ट मध्ये टाकण्यात आले असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठेकेदाराच्या अनामत रक्कम परत करण्याचे कारण काय आहेत तसेच मुख्य प्रवेशद्वार तोडून दुकान बांधण्यात आले असून याची परवानगी कोणी दिली याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :(१) केंद्र शासनाच्या I.D.S.M.T. योजनेअंतर्गत मालेगाव महानगरपालिका हद्दीतील व्यपारी गाळे व मुख्य ऑडीटोरियम हॉल या कामासाठी केंद्र व राज्य व महानगरपालिका निधीतून एकूण १.८१ कोटी एवढ्या रकमेच्या कामासाठी निविदा प्रक्रिया रबवून, श्री.कैलास हरी पाटील या निविदा धारकाची निवड करण्यात आली.

सदर निविदा धारकास दिनांक २५.०७.२००६ रोजी कार्यादेश देऊन, सदरचे संबंधित मक्तेदाराने दिनांक २१.०१.२००८ पर्यंत पुर्ण करणे अपेक्षित होते, तथापि, सदर जागेवर होणारे अतिक्रमण व मक्तेदाराकडून झालेला विलंब या कारणास्तव, मक्तेदारास वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

अद्यापपावेतो या कामावर रुपये ४६.०९ लक्ष खर्च झालेला असून पार्कींग, स्लॅब, ऑडिटोरियमचे कॉलम व व्यापारी गाळे इत्यादी कामे झालेली आहेत.

स्थायी समितीच्या ठरावानुसार, मक्तेदार यांना काळ्या यादीत न टाकता त्यांचे आजपर्यंतचे कामाचे बिल अदा करुन, सदर कामाची नविन जिल्हा दर सुचीनुसार, अल्प मुदतीची निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार दोनवेळा फेर निविदा मागविण्यात आल्या असल्या तरी, त्यास प्रतिसाद मिळाला नाही.

(२) सदर मक्तेदाराची अनामत रक्कम रुपये ४,२०,६७१/- ही मक्तेदाराच्या विनंतीनुसार, त्यांच्या थकीत मालमत्ता करापोटी (घरपट्टी) समायोजित करण्यात आली असून, सद्यस्थितीत मक्तेदार यांची उर्वरीत अनामत रक्कम रुपये २,३५,५०७/- इतकी महानगरपालिकेकडे जमा आहे.

तसेच मुख्य प्रवेशद्वारावर दुकान बांधण्यास नगर रचना विभागाकडून बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही, वा त्याठिकाणी कोणतेही बांधकाम करण्यात आलेले नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी संबंधीत ठेकेदाराने विहीत कालावधीत काम पूर्ण केले नाही, तसेच ठेकेदारास वेळोवेळी मुदतवाढ दिल्यानंतरही, अद्यापपर्यत काम पूर्ण झाले नसल्याने, या प्रकरणी चौकशी करुन, संबंधीतावर जबाबदारी निश्चित करण्याबाबत, विभागीय आयुक्त, नाशिक यांना सुचना देण्यात आल्या आहेत.

मालेगांव (जि.नाशिक) शहरासह परिसरात विविध साथीच्या आजारातील रुग्णाबाबत

(१६) १९५५९ (१०-०८-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरासह परिसरात वाढत्या उष्म्यामुळे अतिसार, मळमळ, थंडी ताप यासह विविध साथींच्या आजारांच्या रुग्णांची संख्या वाढत असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रुग्णांना पालिकेच्या वाडिया अली अकबर या रुग्णालयात व उपकेंद्रावर पुरेसा औषधसाठा नसल्याच्या निषेधार्थ स्थायी समिती सभापती यांनी रुग्णालयात प्रवेशद्वारे बंद आंदोलन सुरू केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी औषध तुटवडा भरुन काढण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :(१) होय,

(२) मालेगाव महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या मा.सभापती यांनी आंदोलन केले होते.

(३) मे, २०१५ मध्ये महानगरपालिकेच्या दवाखान्यात डायरीयाच्या रुग्णाच्या संख्येत अचानक वाढ झाल्याने, महानगरपालिकेच्या अली अकबर दवाखान्यातील उपलब्ध साठा काही प्रमाणात कमी पडला.

मात्र महानगरपालिकेच्या मध्यवर्ती औषध भांडारातील उपलब्ध औषधे सदर दवाखान्यांना महानगरपालिकेमार्फत तत्काळ उपलब्ध करुन देण्यात आले. तसेच, दवाखान्यात औषधांचा तुटवडा होणार नाही, याची दक्षता महानगरपालिकेमार्फत घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या रूक्मिणीबाई रूग्णालय, कल्याण (पश्चिम) येथे बेवारस शवविच्छेदनाचा रूग्णालयावर भार पडत असल्याबाबत

(१७) १९९११ (११-०८-२०१५). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या रूक्मिणीबाई रूग्णालय, कल्याण (पश्चिम) येथे दरवर्षी बाराशे बेवारस शवविच्छेदन केले जात असल्यामुळे या रूग्णालयावर भार पडत असल्याची माहिती दि.२१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या दरम्यान मा.आयुक्तांनी नगरविकास विभागाला देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण परिसरात या व्यतिरिक्त कोणतेही शवविच्छेदनाची सुविधा असलेले रूग्णालय उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रूक्मिणीबाई रूग्णालयाला पर्यायी रूग्णालयाची व्यवस्था शासनाने केली आहे काय वा करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०२-२०१६) :(१) नाही,

तथापि, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या वेद्यकीय कर्मचारीवृंद अपुरा पडत असल्याने कार्यरत वेद्यकीय कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण येऊन त्यांच्या रुग्णालयीन सेवेवर विपरीत परिणाम होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी त्यांच्या दि.२७/०३/२०१५ च्या पत्रान्वये महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील रुग्णालय/नागरी आरोग्य केंद्रांकरीता वैद्यकीय संवर्गातील पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. त्यामध्ये बाई रुक्मिणीबाई रुग्णालय, कल्याण (प.) येथे दरवर्षी सुमारे १२०० शवविच्छेदन करण्यात येत असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी शासनास कळविले.
(२) होय,
(३) आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी त्यांच्या दि.२७/०३/२०१५ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य शसनाने महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील रुग्णालय/नागरी आरोग्य केंद्रांकरीता वैद्यकी संवर्गातील ८३ पदे निर्माण करण्यास मान्यता दिली आहे. ही पदे भरण्याची कार्यवाही कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

वैद्यकीय संवर्गातील भरतीची प्रक्रिया पार पडल्यानंतर महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णांना विविध आरोग्य विषयक सुविधा तसेच शवविच्छेदनाची सुविधा देण्यास रुक्मिणीबाई रुग्णालय अधिक सक्षम असले असे आयुक्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी शासनास कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत लहान-मोठे नाल्यातील गाळ काढण्याचे कामाबाबत

(१८) २०३३१ (११-०८-२०१५). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत सव्वातीन लाख मीटर लांबीचे लहान-मोठे नाले असून त्यातील गाळ काढण्याचे काम दिनांक ३१ मे, २०१५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २७ मे, २०१५ पर्यंत यातील ३ लाख मीटर लांबीचे नाले साफ झाले असून त्यातील ३ लाख २३ हजार टन म्हणजेच अपेक्षित गाळांच्या ९३ टक्के गाळ काढण्याचा दावा महानगरपालिका प्रशासनाने केला असला तरीही आजही (दिनांक १ जून, २०१५ अखेर) शहरातील अनेक नाले सफाईच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मालवणी येथील नाला, मोगरानाला, बांद्रे पूर्व येथील चमडा नाला आणि पूर्व उपनगरातील गोवंडी, देवनार भागातील तसेच झोपडपट्ट्यामधून वाहणारे बहुतांश नाल्यामधील कचरा/गाळ उचलला गेलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहरातील सव्वा तीन लाख मीटर लांबीच्या लहान-मोठ्या नाल्यातील संपूर्ण गाळ लवकरात लवकर काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१६) :(१) होय, मोठ्या नाल्यातील गाळ काढण्याचे काम ७ जूनपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असते.

(२) होय, उर्वरित ७ टक्के गाळ काढण्याचे काम दिनांक ०७.०६.२०१५ अखेर सुरु होते.

(३) हे खरे नाही. पश्चिम उपनगरातील पूर्व नालसफाई अंतर्गत मालवणी नाला, मोगरा नाला, चमडावाडी नाला तसेच शहर व पूर्व उपनगरातील नाल्यांमधील गाळ/कचरा निश्चित कार्यक्रमानुसार उचलण्यात आला आहे.

सदर नाले झोपडपट्टी क्षेत्रातून वाहत असल्यामुळे नाल्यालगतच्या रहिवाश्यांकडून नाल्यामध्ये कचरा तसेच टाकाऊ वस्तू सतत टकण्यात येत असल्यंमुळे तसेच भरती ओहोटीमुळे समुद्रातील कचरा नाल्यामध्ये येत असल्याने नाल्यांचीसफाई न झाल्याचे चित्र निर्माण होते.

पूर्व उपनगरातील मोठ्या नाल्यांच्या सफाईचे काम दिनांक ०७ जून, २०१५ पर्यंत करण्यात आले आहे.

(४) मुंबई शहर विभाग व उपनगरातील पावसाळा पूर्व नालेसफाईची कामे दि.०७.०६.२०१५ पर्यंत पूर्ण करण्यात आली आहेत.

नालेसफाईची विद्यमान कंत्राटे रद्द करण्यात येऊन पुढील वर्षाकरिता गाळा काढण्याच्या दृष्टीने निविदेतील अटी व शर्तीमध्ये दुरुस्त्या करुन फेरनिविदा मागविण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

उल्हासनगर (जि.ठाणे) येथुन वाहणा-या वालधुनी नदीचे
शुध्दीकरण आणि विकास करण्याबाबत

(१९) २०३८६ (१०-०८-२०१५). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन- २००७ साली मुंबईतील मिठी नदीच्या धर्तीवर उल्हासनगर (जि.ठाणे) येथुन वाहणा-या वालधुनी नदीच्या शुध्दीकरण आणि विकास करण्याकरीता वालधुनी प्राधिकरण तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली गठीत करुन विकास करण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. यांचेकडे सदर काम सुपुर्द करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यासन, सन-२००७ साली मेसर्स मेरी व सी.इ.एस.यांच्यामार्फत सर्वे करण्यात येवुन ६१८ कोटी रुपये खर्चाचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राधिकरणाबाबत एम.एम.आर.डी.ए ने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय व सदर प्राधिकरणाबाबत ची सद्यस्थिती काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या वालधुनी नदी विकास समन्वय समितीच्या कार्यकक्षेप्रमाणे (वालधुनी नदीचे) महाराष्ट्र संशोधन संस्था, नाशिक (मेरी) यांनी तयार केलेल्या अहवालानुसार वालधुनी नदीचे रुंदीकरण व विकास कामे सुचविण्यासाठी नेमलेल्या सल्लागार मे.सी.इ. एस. इंडिया प्रा.लि. यांनी एक अहवाल तयार केला आहे. वालधुनी नदीचा विकास व संरक्षण व संवर्धनासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत विभागाच्या दिनांक २२.०६.२०१५ रोजीच्या परिपत्रकानुसार वालधुनी नदी संदर्भातील विकास कामे त्या त्या स्थानिक नागरी संस्थेने संबंधित विभागामार्फत हाताळाण्यात, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) सेक्टर ९ ई मध्ये बिल्डरने पार्किंगसाठी पदपथ हडप केल्याबाबत

(२०) २०६६८ (११-०८-२०१५). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) सेक्टर ९ ई मध्ये बिल्डरने पार्किंगसाठी पदपथ हडप केल्याची घटना माहे मे, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पार्किंगसाठी हडप केलेले पार्किंग हटवून पदपथ उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :(१) नाही.

(२) व (३) विकासकाने त्यांना आवश्यक असलेल्या ले-बाय पार्किंगसाठी ३० मी. रुंद रस्त्यंच्याकडेने जागा त्यांच्या भूखंडामध्ये दर्शवलेली होती. ह्या करित विकासकाने ले-बाय पार्किंगसाठी थेट रस्त्यावरुन मार्ग दिलेला होता. ज्यामुळे त्या रस्त्यालगत असलेल्या पदपथाची उंची पूर्वीपेक्षा कमी केलेली आढळून आली. सबब, विकासकाने पार्किंगसाठी पदपथ बळकावलेला नाही.

तरीही दिनांक १२.१२.२०१४ रोजी विकासकास सुधारित ले बाय पार्किंग करिता योग्य त्या सूचना दिल्या आहेत. सुधारित नकाशानुसार पदपथावरुन दोन ठिकाणी गाड्यांना जाण्या-येण्याकरिता मार्ग ठेवण्यात आले आहेत व बाकी उलेल्या पदपथाची उंची पुर्वावस्थेत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपुर महानगरपालिकेने मालमत्ताधारकांना मालमत्ता करामध्ये सुट दिल्याबाबत

(२१) २१११९ (३०-१२-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपुर महानगरपालिकेने मालमत्ताधारक यांनी मालमत्ता करामध्ये सुट न मागता अश्या अनेक मालमत्ताधारकांना जवळपास ८ कोटी रु.ची सुट देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुठल्याही मालमत्ता करात विना विनंती अर्ज करता सुट देणे हे नागपुर महानगरपालिकेच्या नियमात आहेत काय,

(३) असल्यास, नागपुर महानगरपालिकेचे ८ कोटीचे उत्पन्न बुडविणा-या अधिका-यांची शासनाने चौकशी केली काय, त्यानुसार अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) सद्य:स्थितीत नागपूर महानगरपालिकेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम लागू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबईतील भूमिहीन शेतमजूर मिठागर कामगार ग्राम कारागिर यांना सिडकोकडून भूखंड वितरित करणेबाबत

(२२) २११८९ (१०-०८-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील भूमिहीन शेत मजूर, मिठागर कामगार, ग्राम कारागिर यांना भूखंड वितरीत करण्याबाबत शासनाने सिडको महामंडळाला सूचना देऊनही सिडको महामंडळाने भूमिहीन शेत मजूर, मिठागर कामगार, ग्राम कारागिर यांना भूखंडाचे वाटप केलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधितांना भूखंडाचे वाटप न करण्याची कारणे काय व कधीपर्यंत भूखंड वाटप करणे अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :(१) व (२) भूसंपदानाच्या तारखेला पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या भूमिहीन शेतमजूर, भूमिहीर कामगार व ग्रामकारागिर यांना ४० चौ.मी. भूखंड देणेबाबतचा शासन निर्णय आहे. त्यानुसार लाभार्थी निश्चित करण्याची कार्यवाही सिडको स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिडकोने अधिकृत धार्मिक व अध्यात्मिक संस्थांना भूखंड वितरीत करण्याबाबत

(२३) २११९१ (११-०८-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोने अधिकृत धार्मिक व अध्यात्मिक संस्थांना भूखंड वितरीत करण्याबाबतचे धोरण जाहिर केले असून त्यांच्यासाठी जवळपास १३९ भूखंड राखीव ठेवले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त १३९ भूखंडपैकी केवळ ९ भूखंडाचे प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित भूखंडाबाबतचे प्रस्ताव शासन मंजूरीसाठी पाठविण्याबाबत सिडकोकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे, तसेच उक्त ९ प्रस्तावास शासनाची मंजूरी प्राप्त झालेली नाही, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :(१), (२) व (३) सिडकोने धर्मिक तथा अध्यात्मिक उपक्रमाकरिता जाहीरातीमार्फत भूखंड वाटप करण्यंचे धोरण ठराव क्र.१०९८०, दि.४.२.२०१४ रोजी मंजूर केले असून त्यास शासनाने दि.९.९.२०१४ रोजी मान्यता दिली आहे.

नवी मुंबई येथील विविध संकुलांमध्ये धार्मिक तथा अध्यात्मिक उपक्रमांकरीता अंदाजे १२५ भूखंड निर्देशित केले आहेत. या व्यतिरीक्त शासनाकडे १६ धार्मिक संस्थांचे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत. या प्रस्तावापैकी १० संस्थांच्या प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त झाली असून सदर संस्थांना भूखंड वाटपाची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भुसावळ नगरपालिका रुग्णालयात श्वान दंशावर वापरण्यात
येणारी रॅबीज लस उपचारासाठी उपलब्ध नसल्याबाबत

(२४) २१७०१ (१०-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ नगरपालिका रुग्णालयात श्वान दंशावर वापरण्यात येणारी रॅबीज लस उपचारासाठी उपलब्ध नसल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपालिका रुग्णालयाने जिल्हा रुग्णालय प्रशासनाकडे रॅबीज लसची मागणी केली असता ती पुरवण्यास नकार दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रॅबीज लस उपलब्ध करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, कार्यवाहीस होणाऱ्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०१६) :(१) व (२) होय.

(३) जिल्हाधिकारी जळगांव, यांनी दि.१८.०८.२०१५ च्या पत्रान्वये मुख्याधिकारी, भुसावळ यांना भुसावळ नगरपरिषद, रुग्णालयास लस उपलब्ध करुन देणेबाबत निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील शिवाजी चौक या परिसरात हॉकर्स झोन रहदारी अतिक्रमण व पार्किंगची समस्याबाबत

(२५) २१७९८ (११-०८-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील शिवाजी चौक या परिसरात हॉकर्स झोन रहदारी अतिक्रमण आणि पार्किंगची मोठी समस्या तेथील नागरिकांची डोकेदुखी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिणामी शहराच्या कानाकोप-यातुन मुख्य बाजारपेठेत दररोज लाखो नागरिक येत असून मात्र त्यांना वाहतुक कोंडीचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, या परिसरातील अनधिकृत हॉकर्सवर काही ठोस कारवाई करण्यात येणार आहे काय,

(४) तसेच या परिसरातील वाहतुक कोंडी सोडविण्याकरिता शासन काही ठोस उपाययोजना करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०१-२०१६) :(१) व (२) होय,

सदर रस्ता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीत येत असून वाहतूक विभागाने जड वाहनांची सर्व वाहतूक मुख्यत्वेकरुन याच रस्त्यंवरुन अनुज्ञेय केली आहे. याशिवाय हा रस्ता शहराच्या मध्यवर्ती भागातून बाजारपेठेच्या लगत जात असल्याने वाहनांच्या वर्दळीच्या वेळी विशेषत: संध्याकाळच्या वेळेस पार्किंगची समस्या जाणवते.

(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत फेरीवाला पथक गठीत करुन फेरीवाल्यांवर दैनंदिन नियंत्रण ठेवले जाते.

(४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने सदरचा रस्ता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे हस्तांतरीत केला आहे. सदर रस्त्यंवर वहतूक सुरळीत करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून शहर वाहतूक समितीच्या माध्यमातून आवश्यक ठिकाणी ट्राफिक वॉर्डन नेमण्यात आले आहेत.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, शहर वाहतूक शाखा व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या माध्यमातून वाहतूक कोंडीवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याबाबतच कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणकर पाडा, कल्याण (पश्चिम) येथील सम्राट अशोक चौक येथे सुशोभिकरणाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(२६) २१७९९ (११-०८-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणकर पाडा, कल्याण (पश्चिम) येथील सम्राट अशोक चौक येथे सुशोभिकरणाच्या कामात गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सम्राट अशोक चौक विकसित करण्याचे काम स्थानिक विकास निधीतून पुर्ण केल्याची बाब महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित मजूर सहकारी संस्थेला बिलाची पूर्ण रक्कम अदा करण्यात आली असून सदर सम्राट अशोक चौक अद्याप ही विकसित करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, संबंधित दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०१-२०१६) :(१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ठ असणारी मांडा टिटवाळा शहर पायाभुत सुविधेपासून वंचित असल्याबाबत

(२७) २१८०२ (११-०८-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ठ असणारी मांडा टिटवाळा शहरे ३२ वर्ष महानगरपालिकेत असुनही पायाभुत सुविधेपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील नागरिकांना मालमत्ता कर भरुनही सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मांडा टिटवाळा परिसरातील लोकवस्ती ६०००० इतकी असून आरोग्य सुविधांसाठी महानगरपालिकेने जिल्हा परिषदेच्या रुग्णालयातच दवाखाना टाकला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त परिसरातील नागरिकांना पायाभुत सुविधा पुरविण्याकरिता शासन काही ठोस उपाययोजना करणार आहे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०१-२०१६) :(१) व (२) हे खरे नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत मांडा-टिटवाळा परिसरामध्ये नागरी सुविधा पुरविण्यात येत आहेत.

(३) होय.

महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता पलिका क्षेत्रात बाई रुक्मिणीबाई रुग्णालय, कल्याण (प.) व शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय, डोंबिवली (प.) ही दोन मोठी रुग्णालये तसेच ४ लहान दवाखाने आणि १३ नागरी आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत.

उपरोल्लेखित चार लहान दवाखान्यांमध्ये मांडा-टिटवाळा दवाखान्याचा समावेश असून हा दवाखाना जिल्हा परिषदेच्या रुग्णालयात सुरु करण्यात आला आहे. या दवाखान्याच्या माध्यमातून या परिसरातील रुग्णांकरीता बाह्यरुग्ण सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या ताफ्यातील सुमारे ४० ते ५० बस पुरेशा देखभाल व दुरुस्ती अभावी आगारातच उभ्या असल्याबाबत

(२८) २१८०६ (११-०८-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या ताफ्यातील सुमारे ४० ते ५० बस पुरेशा देखभाल व दुरुस्ती अभावी आगारातच उभ्या असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बसच्या दुरुस्तीसाठी आवश्यक असणारे सुट्टे भाग दुरुस्तीसाठी आवश्यक असणारी अन्य सामग्री नसल्याचे समजते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, यावर काय उपाययोजना करण्यात आली वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०१-२०१६) :(१) नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमात सद्य:स्थितीत असलेल्या एकूण १५९ बसेस पैकी ११० बसेस संचालनासाठी उपलब्ध आहेत. उर्वरित ४९ बसेसच्या निर्लेखनाची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आली आहे. तर ७ बसेसबाबतची निर्लेखनाची कार्यवाही प्रलंबित आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत दररोज निघणारे सुमारे २०० दशलक्ष लीटर सांडपाणी कोणत्याही प्रक्रियेविना कल्याणच्या खाडीत सोडल्या जात असल्याबाबत

(२९) २१८०८ (१०-०८-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत दररोज निघणारे सुमारे २०० दशलक्ष लीटर सांडपाणी कोणत्याही प्रक्रियेविना कल्याणच्या खाडीत सोडले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांडपाण्यापैकी जेमतेम १० टक्के पाण्यावर २ मलनिसा:रण प्रक्रिया केंद्रात करत असून उर्वरित ८० टक्के पाण्यावर प्रक्रिया न करता पाणी खाडीत सोडले जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासनाकडून जवाहरलाल नेहरु योजनेतून या प्रकल्पासाठी १६७ कोटी ६३ लाख पालिकेत मंजूर केले असून ही समस्या सोडवण्यास अपयशी ठरत असल्याचे दिसून येत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०१-२०१६) :(१) व (२) नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत दररोज २१६ दशलक्ष लीटर एवढे सांडपाणी निर्माण होते. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात कार्यान्वित करण्यात आलेल्या ४ मलशुध्दीकरण केंद्राच्या माध्यमातून प्रति दिन ७३ दशलक्ष लीटर एवढ्या सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. तर उर्वरित सांडपाणी सेफ्टीक टॅक व शोष खड्ड्यांद्वारे प्रक्रिया करुनच नाल्यात सोडण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील बारावे, आधारवाडी, टिटवाळा (पूर्व) आणि टिटवाळा (पश्चिम) येथील मलशुध्दीकरण केंद्रे कार्यरत आहेत. तर कल्याण (पूर्व) व डोंबिवली (पश्चिम) येथील मलशुध्दीकरण केंद्राची कामे प्रगतीपथावर असून ती डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण (पूर्व) (जि.ठाणे) या भागातील रस्त्यावरील बेकायदा बांधकामाबाबत

(३०) २१८१० (१०-०८-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (पूर्व) (जि.ठाणे) या भागातील काटेमानिवली, गणपती मंदिर, म्हसोबा चौक ते कोटे इमारतीपर्यंत ४० फूट रुंदीचा विकास आराखड्यातील रस्ता, तसेच म्हसोबा चौक ते तिसगांव नाक्यापर्यंतचा रस्ता बेकायदा बांधकामाच्या विळाख्यात सापडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही रस्त्यावरील अतिक्रमणे अनाधिकृत बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांनी तोडली नाही असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यापारांकडून अधिकारी दुकाने विस्तारित करण्यासाठी पैसे घेऊन बेकायदा बांधकामावर कारवाई करत नाही असे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०१-२०१६) :(१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती येथील रुख्मिणी नगर परिसरातील अतुल मंगल कार्यालयाच्या संचालकांनी सर्व्हिस लाईनला पार्किंग झोन केल्याबाबत

(३१) २३०३८ (११-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील रुख्मिणी नगर परिसरातील अतुल मंगल कार्यालयाच्या संचालकांनी सर्व्हिस लाईनला पार्किंग झोन म्हणून उपयोगात आणत असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पार्किंगची व्यवस्था नसेल तर कारवाई होणार असा इशारा संबंधित महानगरपालिका आयुक्तांनी दिल्याने उक्त मंगल कार्यालय सर्व्हिस लाईनला पार्किंग झोन म्हणून वापर असुन त्यांनी तेथे सीसीटीव्ही लावले असल्याने या रस्त्यावरुन काही प्रसंगी ये-जा करणाऱ्या व्यक्तींना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे हे पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१६) :(१) हे, हे खरे आहे.

(२) महानगरपालिकेकडून संबंधीत मंगल कार्यालयाच्या संचालकांना दि.२५/८/२०१५ अन्वये याबाबत खुलासा सादर करण्याबाबत नोटीस देण्यात आलेली आहे.

सदरचे सीसीटीव्ही बसविल्यामुळे सामान्य नागरिकांना त्रास होत असल्यंची बाब निदश्रनास आलेली नाही किंवा अशी तक्रार महापालिकेकडे प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिडकोचे हस्तांतरण शुल्क विकासाकडून वसुल करण्याची मागणी

(३२) २३०५२ (११-०८-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोच्या त्रिपक्ष कराराप्रमाणे कराराचे नोंदणी शुल्क व शुल्काचे सिडकोचे हस्तांतरण शुल्क विकासाकडून वसुल करण्याची मागणी एका सामाजिक संघटनेने सिडको प्रशासनाकडे व शासनाकडे माहे मे २०१५ मध्ये वा त्या सुमारास केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व यावर निर्णय केव्हा घेण्यात येईल ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०१६) :(१), (२) व (३) नाही. तथापि सिडकोच्या वसाहत विभागातील (१२.५ टक्के योजना) प्रचलित कार्यपध्दतीनुसार त्रिपक्षीय करारनामा करताना भूखंडाचे परवानाधारक विहित नमुन्यात आवश्यक त्या कामगदपत्रांसह वसाहत विभागामध्ये अर्ज दाखल करतो. भूखंडाच्या हस्तांतरणाचा अर्ज मंजूर झाल्यानंतर अर्जदाराच्या नावे

हस्तांतरणाचा ना हरकत दाखला व हस्तांतरण शुल्क भरण्याचे पत्र दिले जाते व परवानाधारकाने हस्तांरण शुल्क भरल्यानंतर त्रिपक्षीय करारनामा केला जातो.

मुंबईतील मानखुर्द शिवाजी नगर येथील नागरीकांच्या सोयी सुविधांसाठी म्हाडाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात होत असलेली टाळाटाळ

(३३) २३३६४ (१०-०८-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील उत्तर पूर्व परिक्षेत्रातील मानखुर्द शिवाजी नगर निर्वाचन क्षेत्रातील नागरीकांच्या सोयी सुविधांसाठी म्हाडाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात होत असलेली टाळाटाळ तसेच मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ योजनेअंतर्गत सामाजिक लाभाच्या सोयीसुवधा उपलब्ध करुन देण्याबाबत होत असलेली दिरंगाईच्या संदर्भात तेथील सेवाभावी पंजीकृत संस्था, रहिवाशी संघ लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (गृहनिर्माण), मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण), मुख्य सचिव (गृहनिर्माण), मुख्य कार्यकारी अधिकारी (म्हाडा), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (म्हाडा), मुख्य अधिकारी (मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ) यांच्याकडे माहे जानेवारी, २०१४, सप्टेंबर, २०१४, जानेवारी, २०१५ आणि दिनांक २५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, सदरचे काम किती कालावधीत हाती घेण्यात येईल वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१६-०२-२०१६) :(१) प्रश्नाधीन निवेदन प्राप्त झाल्याची बाब निदर्शनास आली नाही. उत्तर पुर्व परिक्षेत्रातील मानखुर्द शिवाजी नगर, निर्वाचन क्षेत्रात नागरीकांच्या सोयी सुविधांसाठी म्हाडास उपलब्ध होणाऱ्या विविध निधी अंतर्गत वेगवेगळ्या प्रकारची कामे केली जातात. मानखुर्द शिवाजी नगर निर्वाचन क्षेत्रात म्हाडाची मालकीची जमिनीवर /भूखंडावर जर नागरीकांच्या सोयी सुविधांसाठी सेवा भावी पंजीकृत संस्था, रहिवाशी संघ लोकप्रतिनिधी यांनी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत अर्ज करुन मागणी केल्यास त्यांच्या अर्जाची छाननी/पडताळणी करुन प्रचलित धोरण/नियमानुसार त्याबाबतची कार्यवाही करुन ना हरकत प्रमाणपंत्र प्रदान करण्यात येते.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांबाबत

(३४) २३४९८ (११-०८-२०१५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे २० वर्षापूर्वीच्या मार्गदर्शकानुसारच कार्य केले जात असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अग्निशमन दलामध्ये ३ हजार अधिकारी व कर्मचारी असून त्यापैकी १५०० अधिकारी व कर्मचारी हे ४५ वर्षाच्यावर आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अधिकारी व कर्मचा-यांचे रोजच्या रोज प्रशिक्षण सत्र होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचा-यांना योग्य ते प्रशिक्षण देण्याबाबत तसेच त्यांच्यावरील कामाचा ताण कमी करणेबाबत शासनाने काेणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) सध्या अग्निशमन दलामध्ये ५१ अधिकारी व १३३३ कर्मचारी हे ४५ वर्षांच्या वरील आहेत.
(३) व (४) प्रत्येक अग्निशमन केंद्रामध्ये रोजच्या रोज प्रशिक्षण सत्र घेतली जातात व त्या प्रशिक्षण सत्रामध्ये परेड व ड्रीलचा समावेश असतो. त्याचप्रमाणे वरिष्ठ अधिका-यांमार्फत सुध्दा वेळोवेळी ड्रील घेतली जातात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगरपालिकेच्या सन २०१४-२०१५ च्या अंदाजपत्रकांत नमूद कामांचा निधी वापराविना पडून असल्याबाबत

(३५) २३६५३ (११-०८-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या सन २०१४-२०१५ च्या अंदाजपत्रकांत नमूद कामांना निधीची तरतूद केली, परंतू आजतागायत या कामांना सुरुवात न झाल्यामुळे सदरचा निधी वापराविना पडून असल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींना आयुक्त, महानगरपालिका, पुणे यांना दि. २२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१६) :(१) सदरचा निधी वापराविना पडून असल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधीकडून निवेदनाद्वारे करण्यात आलेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील बहुसंख्य रस्त्यांवर अत्यावश्यक सेवांच्या नावाखालील कामांमुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असल्याबाबत

(३६) २४११८ (११-०८-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाळा तोंडावर येऊनही पुणे शहरातील बहुसंख्य रस्त्यांवर अत्यावश्यक सेवांच्या नावाखाली सुरु असणाऱ्या महानगरपालिकेच्या कामांमुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही विकासाची कामे पहिल्या वाहिन्या खराब झाल्यामुळे करण्यात येत नसून केवळ तरतूद आहे म्हणून केली जातात, त्यामुळे महानगरपालिकेचा चांगला रस्ता खोदणे, सुस्थितीतील वाहिनी काढून नवीन टाकणे आणि गरज नसताना खर्च होणे असे तिहेरी नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१६) :(१) नाही.

पुणे शहरातील सर्व रस्त्यांवर अत्यावश्यक सेवा सुविधांकरिता वाहिन्या विकसनाचे व देखभाल दुरुस्तीचे काम पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये पाणीपुरवठा, मलनि:सारण इ. सेवासुविधा वाहिन्यांच्या विकसनाचे देखभाल दुरुस्तीची कामे आवश्यकतेनुसार व अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार करणेत येतात. अत्यावश्यक सेवांच्या नावाखाली कोणतीही अनावश्यक विकासकामे करण्यात येत नाही.

तसेच पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये पावसाळ्याच्या कालावधीत म्हणजे १ जून ते ३० सप्टेंबर अखेर वाहिन्या टाकण्यासाठी खोदाईस परवानगी देण्यात येत नाही. काही अपवादात्मक परिस्थितीत आवश्यकतेनुसार दुरुस्तीचे काम करणेकरिता खोदाईस परवानगी देण्यात येते.

सदरचे काम करताना नागरिकांची गैरसोय होणार नाही याकरिता सुरक्षिततेच्या व सोयीसुविधेच्या दृष्टीकोनातून योग्य त्या उपाययोजना पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असतात. दरवर्षी ३१ मे अखेर पुणे शहरातील विकास कामासाठी खोदाईची कामे पूर्ण करण्यात येतात.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगरपालिकेतील हद्दीतील हिंगणे खुर्द येथील रस्ता रुंदीकरणाबाबत

(३७) २४२२३ (१०-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेतील हद्दीतील हिंगणे खुर्द येथील अधिकृत इमारत रस्ता रुंदीकरणात येत नसतानांही पाडण्याची कारवाई केल्याची बाब माहे जून, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दिवाणी न्यायालयाने मालकास सुमारे १७ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचा आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणीची चौकशी करण्यात आली आहे काय, चाैकशीअंती दोषी संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१६) :(१) पुणे महानगरपालिका हद्दीतील संयुक्त मोजणी नुसार सदर इमारत ३६.०० मी.डी.पी. रस्ता रुंदीमध्ये बाधित होती. तसेच सदर इमारत अधिकृत असलेबाबत कोणतेही कागदपत्रे नसल्यामुळे, सदर इमारत दिनांक ५.११.२००४ रोजी पाडण्यात आली होती. तथापि, मा.दिवाणी न्यायालयाने मालकांस नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिनांक २७.५.२०१५ रोजी दिले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) होय.

(३) सदरची इमारत रस्ता रुंदीत बाधित होत असल्याने व अनधिकृत असल्याने प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे पुणे महानगरपालिकेतर्फे अपिल करण्याची कार्यवाही करणत येत आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक महानगरपालिकेस जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान योजनेअंतर्गत मुकणे धरणातून मंजूर करण्यात आलेल्या थेट पाईपलाईन योजनेबाबत

(३८) २४६१९ (१२-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेस जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान योजनेअंतर्गत मुकणे धरणातून मंजूर करण्यात आलेल्या थेट पाईपलाईन योजनेचे काम हे गेल्या एक ते दिड वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजने काम प्रलंबित राहण्यामागील नेमकी कारणे काय आहेत,

(३) सदरहू योजनेचे काम हे तातडीने सुरु करण्याचे दृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :(१) होय.

(२) मुकणे धरणातून नाशिक शहरास पाणी पुरवठा करावयाच्या योजनेच्या निविदा प्रक्रियेबाबत लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने शासनाने दिनांक १८.०५.२०१५ रोजी सदर निविदा प्रक्रियेस तात्पुरती स्थगिती दिली होती.

तद्नंतर याप्रकरणी दिनांक २६.०५.२०१५ व दिनांक १०.०६.२०१५ रोजी मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांच्याकडे संबंधित लोकप्रतिनिधी व नाशिक महानगरपालिकेच्या अधिकायासमवेत सुनावणी झाली.

याबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्या अहवाल विचारात घेऊन याप्रकरणी देण्यात आलेली स्थगिती उठविण्यात येऊन, पुढील कार्यवाही करण्याच्या सुचना आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना दि.२०.८.२०१५ अन्वये देण्यात आल्या आहेत.

(३) नाशिक महानगरपालिकेकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरात भूकंपासारखी दुर्घटना घडल्यास या आपतकालीन स्थितीशी सामना करणारी स्वतंत्र यंत्रणाच पुणे महानगरपालिकेकडे नसल्याबाबत

(३९) २५४८२ (११-०८-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात भूकंपासारखी दुर्घटना घडल्यास या आपतकालीन स्थितीशी सामना करणारी स्वतंत्र यंत्रणाच पुणे महानगरपालिकेकडे नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तब्बल ४५ लाख लोकसंख्या असलेल्या पुणे शहरात आपत्ती व्यवस्थापनाची जबाबदारी अग्निशमच्या ५५० कर्मचा-यांवर असून, केवळ आगीशी आणि पूरजन्य स्थितीशी दोन हात करण्यासाठीची उपकरणे असून भूंकप अथवा इमारत कोसळल्यावर कराव्या लागणाया उपाययोजनांसाठीही कोणतीही साधनसामुग्री नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील १ व २ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) व (३) सद्यस्थितीत पुणे महानगरपलिकेच्या अग्निशमन दलाकडे ५४५ पदे मंजुर असून, ४७२ पदांवर अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

याव्यतिरिक्त पुणे महानगरपालिकेकडे आपत्कालीन कक्षामध्ये ३ शिफ्टमध्ये १ इंजिनिअर, १ लिपिक टंकलेखक, १ शिपाई कार्यरत असून, महानगरपालिकेच्या विविध विभागातील एकूण २७० सेवकांची आपत्कालीन यंत्रणेसाठी नेमणुक करण्यात आलेली आहे.

तसेच क्षेत्रिय स्तरावर आपत्कालीन परिस्थितीमध्ये मदत व प्रतिसाद देण्यासाठी २५ व्यक्तींची टिम तयार ठेवण्यात आली आहे असे एकूण ३७५ सेवक कोणत्याही प्रकारची शहरात आपत्ती उद्भवल्यास सदरचे टिममधील सेवक तात्काळ उपलब्ध होतात.

भूकंप व इमारत कोसळ्यानंतर उपाययोगात येणारी प्रथम प्रतिसाद देणारी यंत्रणा म्हणून अग्निशमन दलास, क्षेत्रीय कार्यालयांना अशा प्रकारच्या आपत्तीमध्ये उपयोगात येणारे सर्व साहित्य आपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत पुरविण्यात आले आहे. या शिवाय आवश्यकता भासल्यास उपयोगात आणणेसाठी शासकीय व अशासकीय संस्थाकडे उपलब्ध आलेल्या यंत्रणांची मदत घेण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई केईएम रुग्णालयात डॉक्टर आणि नर्सेसच्या निष्काळजीपणामुळे महिलेचा मृत्यु झाल्याबाबत

(४०) २५९१४ (११-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई लालबाग येथे राहणारे रमेश सोनाने यांची पत्नी ममता सोनाने यांना केईएम रुग्णालयात दि.२० सप्टेंबर, २०१२ रोजी औषधोपचारासाठी दाखल करण्यात आले असताना डयुटीवर असणा-या डॉक्टर आणि नर्सेसच्या हलगर्जीपणामुळे चुकीचे इंजेक्शन दिल्यामुळे ममता यांचा मृत्यु झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी राज्य माहिती आयुक्त यांनी गैरहजर राहिलेल्या डॉक्टरांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१६) :(१) हे खरे नाही.

ड्युटीवर असलेल्या डॉक्टर आणि परिचारीकांच्या हलगर्जीपणामुळे चुकीचे इंजेक्शन दिल्यामुळे श्रीमती ममता सोनाने यांचा मृत्यू झाला नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेत बनावट आर्किटेक्ट एजंटचा सुळसुळाट असल्याबाबत

(४१) २५९१५ (११-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेत मागील १० वर्षापासून बनावट आर्किटेक्ट एजंटचा सुळसुळाट असून महानगरपालिका नगररचना विभागातर्फे बनावट एजंटना अधिकृत परवाना दिल्याची बाब दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी करुन बनावट एजंटबरोबर महानगरपालिकेतील संबंधीत अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत येथील नागरीकांना व नगरसेवकांनी शासनाकडे तसेच महापालिका आयुक्तांकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०१६) :(१) नाही,

तथापि, अशा अशयाची तक्रार मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे प्राप्त झाल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(२) होय.

(३) मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून विकास प्रस्तावाबाबतची परवानगी नोंदणीकृत वास्तुविशारद किंवा महानगरपालिकेकडील नोंदणीकृत सल्लागार अभियंत्यांमार्फत देण्यात येत असल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण रेल्वे स्थानकालगत असलेल्या स्कायवॉकला पंधरा दिवसात दोनदा आग लागल्याची घटना

(४२) २५९१६ (११-१०-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण रेल्वे स्थानकालगत असलेल्या स्कायवॉकला पंधरा दिवसात दोनदा आग लागल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगी संदर्भात शासनाने चौकशी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०१-२०१६) :(१) होय.

स्कायवॉकच्या पॅनेलमध्ये टाकलेल्या कचऱ्यामुळे माहे एप्रिल, २०१५ मध्ये स्कायवॉकवर दोन वेळा आग लागल्याच्या घटना घडल्या आहेत.

(२) सदर स्कायवॉकवर फेरीवाले व गर्दुल्यांकडून स्कायवॉकच्या पॅनेलमध्ये कचरा टाकण्यात येऊन करण्यात आलेल्या गैरकृत्यामुळे स्कायवॉकवर आग लागण्याचे प्रकार घडले आहेत. या घटनांनंतर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभाग क्षेत्र कार्यालयाकडून पॅनेलमधील कचरा साफ करुन पॅनेल व्यवस्थित लावण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच स्कायवॉकवरील फेरीवाल्यांना हटविण्याची कार्यवाही दोन्ही सत्रात करण्यात येत आहे. परिणमी अशा प्रकारांना आळा बसण्यास मदत झाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शीव, मुंबई येथील लोकमान्य टिळक रुग्णालयामध्ये एका चटईवर ३/३ रुग्ण असल्याबाबत

(४३) २६००२ (१०-०८-२०१५). डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शीव, मुंबई येथील लोकमान्य टिळक रुग्णालयामध्ये एका चटईवर ३/३ रुग्ण असल्याचे दिनांक १० मे, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अधिष्ठाता यांच्याकडे चौकशी करण्याकरिता गेले असता क्षमतेपेक्षा जास्त रुग्ण असल्यामुळे अशा प्रकारे व्यवस्था करण्यात आली असे सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा गंभीर प्रकारामुळे नातेवाईक व रुग्णालय अधिकारी/कर्मचारी यांची वांरवार भांडणे होण्याचे प्रकार नेहमी घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे रुग्णाची झालेली वाढ यामुळे सदरचे रुग्णालय अपुरे पडत असल्याने अशा प्रकारचे नवीन रुग्णालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१६) :(१) हे अशत: खरे आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये खाटांच्या क्षमतेपेक्षा रुग्णांची संख्या खुप जास्त असूनही रुग्णांना आवश्यक वैद्यकीय उपचार वेळेत देणे शक्य व्हावे म्हणून सदर परिस्थिती वरचेवर उद्भवण्याची शक्यता असते.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) विशेष व अतिविशेष उपचारांकरिता प्रमुख रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांचा प्रचंड ओघ लक्षात घेऊन, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांच्या सक्षमीकरणासाठी आवश्यक ती

कार्यवाही सुरु आहे. तसेच भांडूप येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नवीन सुपरस्पेश्यालिटी रुग्णालय बांधण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

अकोला महानगरपालिकेत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान प्रकल्पामधील गैरव्यवहाराबाबत

(४४) २६०३७ (११-०८-२०१५). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान प्रकल्पामध्ये रुपये ५० लक्षाचा गैरव्यवहार झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला महानगरपालिका यास दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास चौकशी करण्यासंदर्भात उपसचिव यांनी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :(१) होय.

(२) होय.

(३) अकोला महानगरपालिका अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान प्रकल्पामध्ये सन २००४ ते २०१० या आर्थिक वर्षात झालेल्या गैरव्यवहाराबाबत आतापर्यंत एकूण ४ चौकश्या समित्यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे.

१) प्रथम चौकशी ही मनपा स्तरावर करण्यात येऊन, त्यामध्ये एकूण ८६ लक्ष रुपयांची आर्थिक अनियमितता दर्शविण्यात आली होती.

२) मनपाच्या चौकशी अहवालाच्या आधारावर राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील समितीने दिनांक १८/११/२०११ ते २२/११/२०११ या कालावधीत तपासणीअंती दिलेल्या अहवालानुसार रु. ३१,३५,०००/- इतक्या रकमेची संबंधितांकडून वसूली करण्याबाबत अहवाल दिलेला होता.

३) सन २०१३ च्या अर्थसकंल्पीया अधिवेशात उपस्थित केलेल्या विधानसभा तारांकित प्रश्नावरील चर्चेच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडील गठीत समितीने चौकशी करुन रु.४,८८,०००/- इतकी वसूल पात्र रक्कम म्हणून निश्चित केली होती.

४) त्यानंतर पुन्हा राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील त्रीसदस्यीय समितीने दि. ११/२/२०१४ ते १५/२/२०१४ या कालावधीत प्रकरणाशी संबंधित सर्व अभिलेख यांची तपासणी केल्यानंतर, रु.२,७५,२६६/- इतकी रक्कम वसूली पात्र ठरविली.

यावर विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडील चाकशी समिती व राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी नियुक्त समितीच्या अहवालामध्ये आर्थिक वसुलीबाबत तफावत असल्यामुळे या प्रकरणी विभागीय आयुक्त अमरावती यांचेकडून महापालिकेव्दारा मार्गदर्शन मागविण्यात आले. त्यावर विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडील दिनांक ७/१०/२०१५ च्या पत्रान्वये राष्ट्रीय आरोग्य अभियान समितीचा अहवाल ग्राह्य धरण्याबाबत कळविण्यात आले आहे.

यानुसार रु. २,७५,२६६/- इतक्या वसूल पात्र रकमेपैकी आतापर्यंत संबंधित ४ डॉक्टरांकडून एकरकमी रु. ४५,७०१/- व कार्यरत लिपीकाच्या मासिक वेतनातून दरमहा रु. ५०००/- प्रमाणे आतापर्यंत रु. २५,०००/- असे एकूण रु. ७०,७०१/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र सरकारकडून शहरे झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या नावाने असलेल्या महत्वाकांक्षी योजनेबाबत

(४५) २६९५१ (१०-०८-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारकडून शहरे झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या नावाने महत्वाकांक्षी योजना शासनामार्फत कार्यान्वित आहे तसेच ७२५०४ उद्दीष्टांपैकी १८००० घरे केवळ पुर्ण (२४%) झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे उद्दीष्ट पूर्ण करण्याकरिता दिनांक ३१ मार्च, २०१५ ही केंद्रात वाढवून दिलेली अंतिम दिनांक होती व उद्दीष्ट पूर्ण न झाल्याने पुढील मुदतवाढ मागितली आहे काय, मुदतवाढ मागितली असेल तर ती मिळाली काय,
(३) असल्यास, उद्दीष्टापैकी २४% उद्दीष्ट पूर्ण झालेले असल्याने उर्वरित ७६% उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणते नियोजन केले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
श्री. प्रकाश महेता (१६-०२-२०१६) :(१) हे खरे नाही. केंद्र पुरस्कृत जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियानातंर्गत बीएसयुपी व आयएचएसडीपी हे दोन उप-कार्यक्रम राज्यातील महानगरपालिका व नगर परिषदांमार्फत राबविण्यात येत आहेत. बीएसयुपी या योजनेसाठी एकुण ११९९८७ व आयएचएसडीपी योजनेसाठी एकुण ९७७०९ अशा एकुण २१७६९६ घरकुलंना केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त आहे. राज्य शासनाने जानेवारी, २०१५ मध्ये प्रकल्पांचा आढावा घेतला व त्यानुसार बीएसयुपी योजनेसाठी ९८११७ घरकुलांचे व आयएचएसडीपी योजनेसाठी ७७८८५ घरकुलांचे असे एकुण १७६००२ घरकुलांचे सुधारित उद्दिष्ट केंद्र शासनास सादर केले आहे. यापैकी बीएसयुपी योजनेतील ६८५९८ घरकुलांचे काम पूण झाले असून २५५६९ घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच आयएचएसडीपी योजनेतील ३८६४२ घरकुलांचे काम पूर्ण झाले असून ३१५०९ घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. सबब, एकुण उद्दिष्टापैकी ९३% घरकुलांचे काम हाती घेण्यात आले असून ६०% घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे.
(२) केंद्र शासनाने सदर योजनेसाठी ३१ मार्च, २०१५ पर्यंत मुदतवाढ होती, ती वाढविण्याबाबत राज्य शासनाने दि.३० मार्च, २०१५ च्या पत्रान्वये विनंती केली होती. केंद्र शासनाने दि.३१ मार्च, २०१७ पर्यंत मुदत वाढविली आहे.
(३) १) योजनेतील उर्वरित घरकुले वाढीव कालावधीत पूर्ण होण्यासाठी विविध स्तरावरुन वेळोवेळी आढावा घेण्यात येत असून प्रकल्प राबविण्यात येणारे अडथळे दुर करण्यात येतात.

मान्य उद्दिष्टे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची असल्याची स्पष्ट जाणिव आढावा बैठकीत वेळोवेळी देण्यात आली आहे.

२) जी घरकुले केवळ किमतीतील वाढीमुळे अपूर्ण आहेत त्यांचे बाबतीत वाढीव अनुदान दि.२८ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय केले आहे.

३) यासंबंधी विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे.

(४) दि.३१ मार्च, २०१७ पर्यंत सर्व घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी पूर्ण प्रयत्न करण्यात येत आहेत.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ता.कळंब, जि.उस्मानाबाद
येथे प्राचार्य, निर्देशांकासह आठ पदे रिक्त

(४६) २८१७६ (१३-१०-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कळंब (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथे प्राचार्य, निर्देशांकासह आठ पदे रिक्त असणे, वीजेअभावी यंत्रे धूळखात पडली असणे, पाण्याची सोय नसणे इत्यादी विविध अडचणींमुळे सदर संस्थेची अत्यंत दयनीय अवस्था झाली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त अडचणीमुळे चालू शैक्षणिक वर्षात सदर संस्थेतील एक अभ्यासक्रम बंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील रिक्त पदे व तेथे विद्यार्थ्यांना लागणाऱ्या विविध सोई-सुविधेच्या मागणीचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करता सदर प्रस्तावाबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :(१) अंशत: खरे आहे. प्राचार्य हे पद रिक्त आहे. परंतु सदर संस्थेचा अतिरिक्त कार्यभार श्री.जी.एम.कुलकर्णी प्राचार्य औ.प्र.संस्थां भुम, जि.उस्मानाबाद यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे. प्रशिक्षणार्थी वंचित राहू नये. याकरीता संस्थास्तरावर तासिका तत्वार निदेशकांची नियुक्ती करुन अभ्यासक्रम पुर्ण करण्यात येत आहे.

कायमस्वरुपी विजपुरवठा मिळणेसाठी स्वतंत्र फिडर लाईन व डीपी बसविणेबाबतच्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबतची कार्यवाही सुरु आहे. उपयोगता नसलेली यंत्रसामुग्री गरज असलेल्या संस्थेला हस्तांतरीत करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

संस्था मुख्य शहरापासून जवळपास १ कि.मी. दुर असल्याने नगर परिषदेची नळजोडणी झालेली नाही. संस्थेस स्वत:चे बोअरवेल आहे. बोअरवेलची मोटार जळाली असल्याने पीपीपी अंतर्गत दुरुस्ती करणेबाबत कार्यवाही सुरु आहे. तथापि खाजगी बोअरवेल करुन पाण्याची व्यवस्था केली आहे.

(२) चालू शैक्षणिक वर्षात बेकर ॲण्ड कन्फेक्शनर या व्यवसायास प्रशिक्षणार्थ्यांची मागणी नसल्याने सदर संस्थेतील हा अभ्यासक्रम बंद करण्यात आलेला आहे.

(३) रिक्त पदे भरण्यासाठी जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली असून उमेदवारांची लेखी परीक्षा दि. २२.११.२०१५ रोजी झालेली असून पदभरतीची कार्यवाही संचालनालय स्तरावरुन सुरु आहे. तसेच अभ्यासक्रम पूर्ण करुन घेण्याकरीता रिक्त असलेल्या पदावर तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) पदभरतीची कार्यवाही संचालनालय स्तरावर सुरु आहे. तसेच चालू आर्थिक वर्षात अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण पुर्ण करुन घेण्यासाठी वेळोवेळी बैठकीत संबंधित प्राचार्यांना प्रादेशिक कार्यालय स्तरावरुन सूचना/आदेश देण्यात आलेले आहेत.

नवी मुंबई विमानतळ क्षेत्रातील प्रकल्पाबाधीत होणाऱ्या तरुणांसाठी सिडकोने टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या (टिप) मार्फत स्थापन केलेल्या व्यवसायिक प्रशिक्षण केंद्राबाबत

(४७) २८२३३ (०५-११-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विमानतळ क्षेत्रातील प्रकल्पाबाधीत होणाऱ्या प्रत्येक गावातील तरुणांसाठी सिडकोने टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या (टिप) सहकार्याने खांदेश्वर येथे दिनांक ३ जानेवारी, २०१४ मध्ये सिडको व्यवसायिक प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रशिक्षण केंद्रामध्ये १४११ युवती, १६३० युवक, ७ अपंग २२४६ दहावी उत्तीर्ण, ४९३ बारावी उत्तीर्ण १७७ पदवीधर, ९ पदवीधारक आणि १२ अभियंते होते, परंतु सदर प्रशिक्षण केंद्रे बंद करण्यात आली असल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे प्रकल्पग्रस्त प्रशिक्षणार्थींचे नुकसान होत आहे याबाबत शासनाने कोणती व्यवस्था केली वा करण्यात येणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) :(१) होय.

(२) व (३) प्रकल्पग्रस्त प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षण व रोजगार या संबंधांची कार्यवाही नियमित सुरु आहे.

खांदेश्वर येथील प्रशिक्षण केंद्र बंद करणत आले नाही, तेथेही नोंदणीप्रक्रिया सुरु आहे. तसेच, प्रकल्पग्रस्त तरुणांसाठी प्रशिक्षण व रोजगार देण्याचे काम बेलापूर प्रशिक्षण केंद्रातून सुरु आहे.

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतन रकमेत वाढ करण्याबाबत

(४८) २९२१० (२१-०१-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्याची योजना चालवली जाते, हे खरे आहे काय,

(२) असलयास, सदर विद्यावेतनच्या रकमेत अनेक वर्षापासून वाढ करण्यात आली नाही, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढत्या महागाईच्या काळात अजूनही जुन्याच विद्यावेतनावर विध्यार्थी शिक्षण घेत असल्यामुळे योजनेचा मुळ हेतू साध्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विद्यावेतनात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) :(१) होय.

(२) होय.

(३) हे खरे आहे. तथापि, त्यामुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेशित विद्यार्थी संख्या व प्रशिक्षणावर परिणाम झालेला नाही.

(४) औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे विद्यावेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत खाजगी, महापालिका व शासकीय भूखंडावरील सुमारे १८०० झोपडपट्टी पुनर्विकासाचे प्रकल्प रखडले असल्याबाबत

(४९) ३१५२१ (२३-१२-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत खाजगी, महापालिका व शासकीय भूखंडावरील सुमारे १८०० झोपडपट्टी पुनर्विकासाचे प्रकल्प रखडले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुनर्विकासाचे काम मिळविण्यासाठी रहिवाशांमध्ये बिल्डंराकडून फुट पाडण्यात येत असल्याने या योजना रखडल्या असल्याने यामध्ये वास्तव्य करणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत आहे हे पाहता शासन याबाबत त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१६-०२-२०१६) :(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील शासकीय, म्हाडा, बृहन्मुंबई हानगरपालिका व खाजगी मालकीच्या जमिनींवरील ऑक्टोबर, २०१५ पर्यंत १८३६ झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव दाखल झाले असून त्यापैकी १४०३ प्रकल्पांना मंजूरी दिलेली आहे. उर्वरित प्रस्तावांबाबत विविध पातळीवर कार्यवाही सुरु आहे.

(२) रखडलेल्या प्रकल्पामध्ये विकासकांकडून फूट पाडण्यात येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले नाही.

तथापि, बृहन्मुंबई व ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व झोपडपट्ट्यांचे कालबध्द सर्वेक्षण करण्याचा निर्णय झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या दि.१२/८/२०१५ रोजी झालेल्या १४ व्या बैकीत घेण्यात आला आहे. त्यास निविदा मागवून खाजगी संस्थांची नियुक्ती करण्यात आली असून सक्षम प्राधिकाऱ्यांकडून झोपडीवाससियांची या माध्यमातून पात्रता तपासण्यात येणार आहे. परिणामी झोपडपट्टीधारकांची पात्रता तपासण्यासंदर्भात सहकारी गृहनिर्माण संस्था व विकासकांचा हस्तक्षेप कमी होईल असे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पाचोरा (जि.जळगाव) येथील ओद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कॉम्प्यूटर ऑपरेटर प्रोग्रॅमिंग असिस्टंट (कोपा) व मोटार मेकॅनिक ट्रेड सुरु करण्याकरीता परवानगी न मिळाल्याबाबत

(५०) ३८३५० (२१-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगाव) येथील ओद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कॉम्प्यूटर ऑपरेटर प्रोग्रॅमिंग असिस्टंट (कोपा) व मोटार मेकॅनिक ट्रेड सुरु करण्याकरीता वरिष्ठ पातळीवरून परवानगी न मिळाल्याने विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात सर्व ओद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये मागील तीन वर्षांपासून परवानगी अभावी या ट्रेडचे आलेले साहित्य धूळ खात पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ट्रेडला अद्यापपर्यंत परवानगी न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या ट्रेडला परवानगी दिली असल्यास, कोणत्या शैक्षणिक वर्षापासून सुरुवात करण्यात येणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) :(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) उक्त ट्रेडच्या मान्यतेसाठी केंद्र शासनाच्या डी.जी.ई.टी., नवी दिल्ली यांची संलग्नता आवश्यक असून त्याबाबत पाठपुरावा चालू आहे.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.